शै.वर्ष २०१९-२०मध्ये इयत्ता ११वी वर्गाची
विद्यार्थी प्रवेश संख्येत वाढ व सामान्य सूचनांबाबत..

# रयत शिक्षण संस्था, सातारा

## उच्च माध्यमिक / कनिष्ठ महाविद्यालये व व्यवसाय अभ्यासक्रम विभाग

परिपत्रक क्र. ४ दि. १० एप्रिल, २०१९

सर्व शाखाप्रमुख,
उच्च माध्यमिक / कनिष्ठ महाविद्यालये व व्यवसाय अभ्यासक्रम विभाग,
रयत शिक्षण संस्था.

**१) इयत्ता ११ वी मधील विद्यार्थी प्रवेश संख्या वाढविणेबाबत -**

आपल्या शाखेमधील अनुदानित, विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित व स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर वर्ग चालविले जात आहेत. या वर्गातील काही विद्याशाखांकडील विद्यार्थी संख्या दिवसें दिवस कमी होत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे शाखेच्या संचनिश्चितीमध्ये अडचणी निर्माण होत आहेत. यासाठी शै.वर्ष २०१९-२० मध्ये आपल्या शाखेतील इयत्ता ११वी ची प्रवेश संख्या कमीत कमी ३० व त्याहुन अधिक होईल, असे नियोजन अत्तापासूनच करुन त्यानुसार कार्यवाही करावी.

**२) हंगामी व तात्पुरत्या स्वरूपात तासिका तत्वावरील नियुक्त्या संपुष्टात आणण्याबाबत-**

शै.वर्ष २०१८ -१९ मध्ये आपल्या शाखेतील अनुदानित / विनाअनुदानित / स्वंयअर्थसहाय्यित उच्च माध्यमिक / कनिष्ठ महाविद्यालये व व्यवसाय अभ्यासक्रम विभागाकडे हंगामी व तात्पुरत्या स्वरूपात तासिका तत्वावर द्वितीय सत्राअखेर/वर्षाअखेर कार्यरत असलेल्या सर्व सेवकांना दि.३०/४/२०१९ रोजी सेवेतून कार्यमुक्त करावे, कार्यमुक्त करण्यापूर्वी सबंधित सेवकाकडे शाखेचे आर्थिक येणे-देणे अथवा साहित्याचा चार्ज असल्यास तो पूर्ण करुनच कार्यमुक्ती आदेश द्यावा व त्याची एक प्रत संस्था कार्यालयाकडे पाठवावी.

**३) शै.वर्ष २०१९-२० मधील हंगामी सेवक नियुक्त्यांबाबत –**

संस्थेच्या उच्च माध्यमिक / कनिष्ठ महाविद्यालये व व्यवसाय अभ्यासक्रम/तांत्रिक विभागाकडील शै.वर्ष २०१९-२० मध्ये रिक्त असणा-या पदांवर हंगामी सेवाकांच्या नियुक्त्या करण्यासाठी कार्यभार विचारात घेउन विषयानुसार मागणी करावी. तसेच शै.वर्ष २०१९-२० मध्ये आपल्या शाखेत हंगामी व तात्पुरत्या स्वरूपात काम करण्यास संबंधीत सेवकास संस्थेची पूर्व परवानगी घेतल्या शिवाय अथवा नियुक्ती आदेश असल्याशिवाय परस्पर शाखेत हजर करुन घेऊ नये. असे केल्याचे निदर्शनास आल्यास संबंधीत उमेदवाराच्या मानधन/ वेतनास शाखाप्रमुखास जबाबदार धरले जाईल.

तसेच शै.वर्ष २०१८-१९ मध्ये ज्या हंगामी सेवकांचे शै.कामकाज समाधानकारक नाही. आशा सेवकांना वेळीच सूचना देऊन त्यांच्या पुढील नियुक्तीबाबत योग्य त्या अभिप्रायासह संस्था कार्यालयाकडे कळवावे .

**४) दोन विषयात द्विपदवीधर असलेल्या सेवाकांच्या माहितीबाबत -**

उच्च माध्यमिक / कनिष्ठ महाविद्यालयाकडे **कायमस्वरूपी** कार्यरत असलेल्या सेवकांपैकी काही सेवकांनी दोन विषयात पदव्युत्तर पदवी धारण केलेली आहे. अशा सेवाकांची माहिती खालील नमुन्यात द्यावी.

| अ.क्र | सेवाकाचे नाव | पदवी / द्विपदव्युत्तर पदव्या | विषय | श्रेणी | दिनांक | सध्या शिकवित असलेला विषय | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

सचिव,
रयत शिक्षण संस्था, सातारा.

प्रत माहितीसाठी,
१. सहसचिव (उ.शि.), रयत शिक्षण संस्था, सातारा
२. सहसचिव (माध्य.), रयत शिक्षण संस्था, सातारा
३. ऑडीटर, रयत शिक्षण संस्था, सातारा.
४. विभागीय अधिकारी, रयत शिक्षण संस्था, मध्य / दक्षिण/ उत्तर/ पश्चिम व रायगड विभाग.